# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १०/०४/२०२४ (बुधवार) दुपार**

---

## अवैधरीत्या देशी विदेशी दारूची विक्री करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

दिनांक ०९/०४/२०२४ रोजी पोस्टे मौदा येथील स्टाफ पोस्टे मौदा हद्दीत पेट्रोलींग करीत असता मुखबिरद्वारे खबर मिळाली की, भुगाव येथील प्रकाश ढोक नावाचा इसम हा त्याचे किराणा दुकानातून अवैधरीत्या दारूची विक्री करीत आहे. अशा खबरे वरुन भुगाव येथील **प्रकाश महादेव ढोक, वय ३८ वर्ष, रा. भुगाव कामठी** यांचे किराणा दुकानाची झडती घेतली असता त्याचे पायाजवळ असलेल्या पांढऱ्या पिशविची पाहणी केली असता १) देशी दारू १८० एम. एल च्या ३४ निपा किंमती २३८०/—रू. २) देशी दारू ९० एम. एल च्या २३ निपा किंमती ८०५/—रू. ३) देशी दारूच्या १२ निपा किंमती १०२०/—रू. ४) विदेशी दारू ९० एम. एलच्या १२ निपा ११४०/—रू असा एकुण ५३४५/—रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीविरूद्ध कलम ६५(ई) महाराष्ट्र दारुबंदी कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. श्री. हर्ष ए पोद्दार पोलीस अधीक्षक नागपुर जिल्हा ग्रामीण, मा. श्री रमेश धुमाळ अपर पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामीण यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे मौदा येथील ठाणेदार सतिशसिंग राजपूत, पोउपनि महेश बोथले, पोहवा रूपेश महादुले, पोहवा गणेश मुदमाळी यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर